**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२१/२०१०</u>**
**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.१</u>**
**<u>निशाणी क्र.११८ वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. बी. रेडे यांच्यामार्फत उलटतपासः</u>**

६. माझे शिक्षण इ.१० वी पर्यंत झालेले आहे. माझी जन्मतारीख ०८.११.१९८१ आहे. वाद दुकानाचा व्यवहार हा सन २००९ मध्ये झालेला आहे. सदर वाद दुकानाचे खरेदीखत मी पाहिलेले आहे. ते सन २००९ मधीलच आहे. सदरचा व्यवहार हा माझ्या वडीलांनी केलेला होता. सदर व्यवहाराची मला थोडीफार माहिती आहे. वाद दुकान हे रमाकांत शालीग्राम पल्हाडे यांच्या मालकीचे होते. सदर वाद दुकानाची मालकी रमाकांत याच्याकडे त्यांच्या कुटुंबातील वाटणीमध्ये त्याला मिळाले होते. आमच्या गावाला नझुल लागू आहे. नझुल अभिलेखामध्ये सदर दुकानाची मालकी कोणाची आहे, हे मी पाहिलेले नाही. कोणताही खरेदी व्यवहार करतांना खरेदीच्या मालकीबाबतचा कागदपत्र खरेदीखतामध्ये जोडावे लागते.

७. आता मला नि.क्र.१२३ कडील खरेदीखत दाखविण्यात आले. सदर खरेदीखतासोबत विकत देणार याची मालकी असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखत ज्या दिवशी निष्पादित केले त्यावेळी खरेदी देणार रमाकांत पल्हाडे हा सदर वाद दुकानाचा मालक नव्हता. मी माझ्या वडीलांची सही ओळखतो.

८. आता मला नि.क्र.१३६ कडील मुळ वाटणीपत्र दाखविण्यात आले. सदर वाटणीपत्रावर साक्षीदार म्हणून माझ्या वडीलांची सही आहे. मी प्रल्हाद जानकीराम डोंगरे यास ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१२३ खरेदीखत निष्पादित करण्यापुर्वी प्रल्हाद जानकीराम डोंगरे यांच्याकडे वाद दुकानाची इसार पावती होती. प्रल्हाद जानकीराम डोंगरे याचा रमाकांत याच्यासोबत काय व्यवहार होता याबाबत मला माहित नाही. सदर वाद मिळकत ही माझ्या वडीलांनी तात्या किरतकर, गजानन श्रीराम बेलुरकर आणि एका कॉन्व्हेंटला दिल्या बाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्र दस्त नाही. हे म्हणणे खरे नाही

की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.२ मधील नमुद केलेला मजकूर मी खोटा नमुद केलेला आहे. वाद मिळकतीच्या ग्रामपंचायत येथे कर भरलेल्या नि.क्र. १२४ च्या व्यतिरीक्त कोणत्याही पावत्या नाहीत तसेच नि.क्र.१२५ नमुना ८ व्यतिरीक्त कोणतेही कागदपत्र माझ्याकडे नाहीत.

९. आता मला नि.क्र.१२४ कडील कर पावती व नि.क्र.१२५ नमुना ८ दाखविण्यात आले. त्यावरील सह्या कोणाच्या आहेत, हे मला माहित नाही. नि.क्र.१२४ व १२५ च्या दस्ताबाबतची माहिती मी माझ्या वकीलांना सदर दाव्याची कैफियत बनवितांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१२४ व १२५ कडील दस्त हे माझ्या वडीलांनी खोटे व बनावट बनविलेले आहे, म्हणून त्याची माहिती माझ्या कैफियतमध्ये नमुद नाही, त्यामुळे सदर दोन कागदपत्रांव्यवतिरीक्त कोणताही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेला नाही. सदर दावा दुकानाबाबत माझ्या वडीलांनी त्यांच्या नावावर दुकान होण्याबाबत नझुल कार्यालयात कोणता अर्ज दिला होता अथवा नाही, याबाबत मला माहित नाही. मी सदरचे दुकान माझ्या नावावर होण्याबाबत नझुल कार्यालयात अर्ज दिलेला नाही. आजपर्यंत सदर दावा दुकानाबाबत मी नझुल कार्यालयातील कोणताही अभिलेख पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा किंवा माझ्या वडीलांचा सदर दुकानाबाबत कोणताही संबंध नसल्याने मी आजपर्यंत नझुल कार्यालयातील दुकानाबाबतचे कागदपत्र पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१२३ कडील खरेदीखत हे माझ्या वडीलांनी व्याजाची सुरक्षा म्हणून नाममात्र करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दिवशी खरेदीखत नि.क्र.१२३ नोंद केले त्या वेळी रमाकांत पल्हाडे हे वाद दुकानाचे मालक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखत करतेवेळी रमाकांत पल्हाडे याच्या वाद दुकान मालकीबाबत कोणताही मालकी अभिलेख नव्हता, त्यामुळे सदर वाद दुकान विकण्याचा व त्याचा ताबा देण्याचा कोणताही अधिकार नव्हता.

१०. हे म्हणणे खरे नाही की, रमाकांत पल्हाडे यास नि.क्र.३६ अन्वयेच्या वाटणीपत्रानुसार दि.२२.०९.१९९४ रोजी वाद दुकान देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, जानकीराम डोंगरे याचे व्याजाचे पैसे माझ्या वडीलांनी परतफेड केली होती म्हणून त्या परतफेड करीता व त्यांच्या पैशाची सुरक्षा म्हणून सदर खरेदीखत माझ्या वडीलांनी

लिहून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.०९.११९४ रोजी माझ्या वडीलांचे पैशे रमाकांत पल्हाडे यांनी व्याजासह परत केले म्हणून माझ्या वडीलांनी नि.क्र.३६ वाटणीपत्रावर साक्षीदार म्हणून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखत हे व्याजाच्या सुरक्षेकरीता नाममात्र केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखत नाममात्र असल्याकारणाने माझ्या वडीलांनी कधीही वाद दुकानाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद दुकानचा ताबा हा पुर्वी रमाकांत पल्हाडे यांच्या ताब्यात होता त्यानंतर तो ताबा त्यांचा मुलगा संतोष पल्हाडे याच्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष पल्हाडे हा सदर दुकानामध्ये धान्य विक्रीचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ मध्ये माझ्या वडीलांनी वाद दुकानाचा जबरदस्तीने ताबा घेण्याचा प्रयत्न केला होता.

११. हे म्हणणे खरे नाही की, पल्हाडे कुटुंब हे आमचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पल्हाडे कुटुंब हे आमचे नातेवाईक असल्याने वादींनी सदर खरेदीखत पलटून मागितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ मध्ये माझ्या वडीलांनी वाद दुकानाचा वाद घातल्याने वादी यांना सदर दावा दाखल करणे भाग पडले. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९ मध्ये माझ्या वडीलांनी रमाकांत पल्हाडे याच्या विरुध्द पो.स्टे. येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात मी सदर वाद मिळकत माझ्या ताब्यात आहे, हा मजकूर खोटा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुकानाचा जेव्हा व्यवहार झाला होता, त्यावेळी मी खुप लहान होतो त्यामुळे मला सदर व्यवहाराबाबत काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २२.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.22 17:43:43 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २२/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २२/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २२/०१/२०२६ |